**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ४३/२०१८** | **दिनांक २९/०५/२०१८** | **कालावधी ५ दिवस**


| **डॉ. सुभाष चव्हाण,** | **डॉ. विजय मोरे,** | **प्रा. विरेश चव्हाण,** |
|---|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी, |
| कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग |
| ९४२२४३१०६७ | ९४२२३७४००१ | ९४२२०६५३४४ |


| **मागील हवामान सारांश<br>दि. २५/०५/२०१८ ते २९/०५/२०१८** | | |
|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | ०.० |
| पाऊस (मिमी) १/१/१८ पासून | : | ६.० |
| पाऊस (मिमी) (गेल्या वर्षी) | : | ३६३३.५ |
| कमाल तापमान (अं.से) | : | ३३.४–३५.० |
| किमान तापमान (अं.से) | : | २२.५–२४.५ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (:) | : | ८७–९८ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (:) | : | ६८–७० |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | ४.०–७.९ |

**हवामान पूर्वानुमान (३०/०५/२०१८ सकाळी ८:३० पासून ०३/०६/२०१८ सकाळी ८:३० वाजेपर्यंत)**

| **हवामांनाचे घटक** | : | **३०/०५** | **३१/०५** | **०१/०६** | **०२/०६** | **०३/०६** |
|---|---|---|---|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | १२ | १३ | १० | ० | ० |
| कमाल तापमान (अं.से) | : | ३३ | ३४ | ३४ | ३३ | ३३ |
| किमान तापमान (अं.से) | : | २७ | २८ | २८ | २७ | २६ |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | : | ८ | ८ | ८ | ४ | ६ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (:) | : | ६७ | ६६ | ६६ | ६७ | ६८ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (:) | : | ८५ | ८४ | ८४ | ८५ | ८७ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | ०१२ | ००३ | ००९ | ००६ | ००३ |
| वाऱ्याची दिशा | : | नै.प. | नै.द. | नै.द. | नै.द. | नै.प. |

## :हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला:

**दिनांक ३० मे ते १ जून, २०१८ पर्यंत पावसाची शक्यता आहे. दिनांक ३० मे ते ३जून २०१८ पर्यंत अवकाश मेघाच्छादित राहिल. दिनांक ३० मे ते ३ जून २०१८ पर्यंत वाऱ्याचा वेग ३ ते १२ किमी प्रति तास राहिल.**

| पिक | पिक अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | पुर्वतयारी | • भात पेरणीसाठी गादी वाफे तयार करताना प्रथम जमीन नांगरून ढेकळे फोडावीत आणि प्रती चौरस मिटर १ किलो शेणखत जमिनीत मिसळावे. जमिनीचा उतार लक्षात घेऊन, उंच निचऱ्याच्या जागी तळाशी १२० सें.मी. उंचीचे उतारानुसार योग्यत्या लांबीचे गादीवाफे तयार करावेत. वाफ्यांना प्रती आर क्षेत्रास १ कि.ग्रॅ. युरिया व ३ कि.ग्रॅ. सिंगल सुपर फॉस्फेट द्यावे. |
| भुईमूग | काढणी | • तयार झालेल्या भुईमूग शेंगांची काढणी करून शेंगा उन्हामध्ये ४ ते ५ दिवस चांगल्या वाळवाव्यात व वाळलेल्या शेंगांची संरक्षित ठिकाणी साठवण करावी. |
| आंबा, काजू | फळधारणा आणि फळे काढणी | • पावसाची शक्यता असल्याने आंबा फळांवर फळमाशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे, फळमाशीच्या नियंत्रणासाठी आंबा बागेत विद्यापीठाने शिफारस केलेले हेक्टरी ४ या प्रमाणात रक्षक फळमाशी सापळे लावावेत.<br>• आंब्यामध्ये मोठया आकाराची काढणीची फळे तयार झाली असून ती काढणीच्या अवस्थेत आहेत. तयार फळे सकाळी दहाच्या अगोदर व दुपारी चारच्या नंतर झेल्याच्या सहाय्यान ८० ते ८५ टक्के पक्वतेला काढावीत. काढलेली फळे साका टाळण्यासाठी व उष्णतेपासून बचाव करण्यासाठी सावलीत ठेवावीत.<br>• काढणी पश्चात बुरशीजन्य रोगापासून आंबा फळांचे संरक्षण करण्यासाठी काढणीनंतर लगेचच फळे ५२° सें.अं. तापमानाच्या पाण्यात १० मिनिटे बुडवून काढावीत आणि नंतर सावलीत वाळवावीत. काढलेली तयार फळे पिकवण्यासाठी ती ६.५ मि.ली इथ्रेल १० लिटर पाणी या द्रावणात ५ मिनिटे बुडवून नंतर सावलीत वाळवावीत. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठानी शिफारस केलेले कोरोगोटेड फायबर बॉक्सच्या सहाय्याने आंबा फळांची पॅकिंग करावी. शक्यतो आंब्याची वाहतूक रात्रीच्यावेळी करावी. फळे काढणीच्या किमान ८ दिवस अगोदर झाडावर कोणतेही औषध फवारू नये.<br>• पावसाच्या सुरूवातीला काजू आणि आंबा झाडांना खोडीकीडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. यासाठी बागेमध्ये प्रकाश सापळयाचा वापर करून जे किटकनाशक जमा होतील ते किटकनाशक मिश्रीत पाण्यात बुडवून नष्ट करून टाकावेत. तयेच खोडकिडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास ज्याठिकाणी प्रादुर्भाव झाला असेल त्याठिकाणची साल १५ मि.मी. पटाशीच्या सहाय्याने काढून खोड किडीला मारून टाकावे. नंतर हा भाग क्लोरोपायरीफॉस (२० टक्के प्रवाही) ५ मि. लि. प्रति लिटर या प्रमाणात द्रावण तयार करून प्रादुर्भित भाग त्या द्रावणाने चांगला भिजवावा. तसेच क्लोरोपायरीफॉस (२० टक्के प्रवाही) १० मि. लि. + ५० मि.ली. रॉकेल खोडकिडीच्या छिद्रामध्ये ओतावे.<br>• फळझाडांची लागवड करावयाच्या जागेवर साफ सफाई करून घ्यावी. आंबा लागवडीसाठी १० X १० मीटर (घन लागवडीसाठी ५ X ५ मीटर) आणि चिकू लागवडीसाठी १० X १० मीटर अंतरावर १ X १ X १ मीटर आकाराचे आणि काजूसाठी ७ X ७ मीटर अंतरावर ०.६ X ०.६ X ०.६ मीटर आकाराचे खड्डे खणून ते चांगली माती आणि ३–४ घमेले शेणखत, आणि २ किलो सिंगल सुपर फॉस्फेट या मिश्रणाने भरून ठेवावेत. |
| नारळ/ सुपारी | –– | • सरासरी तापमानात वाढ झाल्यामुळे नारळाच्या बागेला ५ ते ६ दिवसांनी आणि सुपारी बागेला ४ ते ५ दिवसांच्या अंतराने पाणी दयावे.<br>• नारळावरील गेंडाभुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये शेणखताच्या खड्डयात दर दोन महिन्यांनी मिथील पॅरॅथिऑन २ टक्के भुकटी मिसळावी.<br>• नारळावरील सोंडया भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी खोडावर १ मिटर उंचीवर गिरमिटाच्या सहाय्याने १५ ते २० सें.मी. खोल तिरपे भोक पाडून त्यामध्ये २० टक्के प्रवाही क्लोरोपायरीफॉस नरसळयाच्या सहाय्याने ओतावे आणि भोक सिमेंटच्या सहाय्याने बंद करावे.<br>• सुपारीवरील कोळेरोग हा बुरशीजन्य रोग असून त्याच्या नियंत्रणसाठी पावसाळा सुरू होण्यापूर्वी झाडावरील वाळलेल्या झावल्या, शिंपुटे काढून पानांच्या बेचक्यात १ टक्का बोर्डो मिश्रणाची फवारणी करावी.<br>• कोळेरोगाच्या यशस्वी नियंत्रणसाठी ०.३ टक्के एलिएट (फॉसिटील एल ८० टके पाण्यात मिसळणारी पावडर ३ ग्रॅम १ लीटर पाण्यात) या बुरशीनाशकाचे द्रावण सुपारी झाडांना मुळावाटे पाच हप्त्यात देण्यात यावे. यासाठी सुपारी झाडाची अन्न घेणारी दोन मुळे निवडून त्याची टोके कापून घ्यावीत. वरील प्रमाणे बुरशीनाशकाचे द्रावण तयार करून प्रत्येकी १०० मि.ली. या प्रमाणात दोन प्लास्टिक पिशव्यात भरून कापलेली मुळे पिशवीत व्यवस्थित बुडवून पिशव्या मुळाला बांधून घ्याव्यात. सदरचे बुरशीनाशक पावसाळा सुरू होण्यापूर्वी द्यावे.<br>• नारळ लागवडीसाठी ७.५ X ७.५ मीटर अंतरावर १ X १ X १ मीटर आकाराचे, आणि सुपारीसाठी २.७ X २.७ मीटर अंतरावर ०.६ X ०.६ X ०.६ मीटर आकाराचे खड्डे खणून ते चांगली माती आणि ३–४ घमेले शेणखत, आणि २ किलो सिंगल सुपर फॉस्फेट या मिश्रणाने भरून ठेवावेत. |
| भाजीपाला लागवड | | • भाजीपाला (वांगी, टोमॅटो, मिरची व नवलकोल) पिकांमध्ये भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनझोल ५ मिली किंवा ८० टक्के पाण्यात मिसळणारी गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारावे.<br>• वेलवर्गीय भाजीपाला पिकामध्ये फळमाशीच्या नियंत्रणासाठी प्रति हेक्टर ४ रक्षक सापळे लावावेत. |
| दुभती जनावरे/ शेळया/ कुकुटपालन | – | • जनावराना पाणी पिण्यासाठी स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी तसेच गोठयामधे हवा खेळती राहिल याची काळजी घ्यावी.<br>• जनावरांना हिरव्या चाऱ्यासाठी झुडूपवर्गीय व बहुवर्षीय वैरणीच्या पिकांची लागवड करावी.<br>• दुभत्या जनावरांना १ ते १.५ किलो खुराक, १५ ते २० किलो हिरवी वैरण व ४ ते ५ किलो वाळलेली वैरणी द्यावी.<br>• सर्वसाधारण एका शेळीस ३–४ किलो हिरवा चारा, २ ते २.५ किलो वाळलेला चारा व ३०० ग्रॅम खुराक प्रतिदिन दयावा.<br>• जनावरांचे येणाऱ्या पावसापासून योग्यते संरक्षण करावे.<br>• ब्रॉयलर पक्षांना पहिले तीन आठवडे त्यांच्या वजनानुसार ब्रॉयलर स्टार्टर व पुढे म्हणजेच चार–सहा आठवडयांपर्यंत ब्रॉयलर फिनीशर खाद्य द्यावे. |
| सुचना | – | • निरनिराळे किडी, रोग जास्त प्रमाणात आढळल्यास नजिकच्या कृषि विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. |